## मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.करू.वी.अकोला अंतर्गत पश्चिम, गुडधी, मलकापुर व म.सं.के परिसर येथील शेततळ्याचा मत्स्यपालन करिता जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला अंतर्गत असलेल्या **पश्चिम, गुडधी, मलकापुर व म.सं.के परिसरात** असलेल्या शेततलावाचा **मत्स्यपालनासाठी** जाहीर लिलाव दि. १६/०६/२०२६ रोजी स १०.३० वा. करण्याचा ठरविण्यात आला आहे. सदर शेततलावाचा जाहीर लिलाव मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत सामान्य विभाग कार्यालय येथे करण्यात येणार आहे.

- शेततलावाची रखवाली ठेकेदारास स्वत :करावी लागेल. राखणदारी करतेवेळी विद्यापीठातील मालमत्तेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी .तसेच नुकसान झाल्यास लिलावाची रक्कम जप्त करून झालेली नुकसान भरपाई ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.
- मत्स्यापालन करताना सुरक्षेबाबतची संपूर्ण जबाबदारी ही लिलाव घेणाऱ्या व्यक्तीची राहील. चोरी,जीवितहानी,नैसर्गिक आपत्ती इत्यादीमुळे काही नुकसान झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
- मत्स्यपालन करताना लिलाव घेणाऱ्या व्यक्तीने रखवाली व मत्स्यापालन निगडीत कामाकरिता कोणाची नियुक्ती केली असेल, अशा व्यक्तीची तपशीलवार माहिती संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांना द्यावी लागेल. पुरविण्यात आलेल्या तपशीलवार माहितीनुसार सदर व्यक्तीची गेटपास तयार करून देण्यात येईल. प्रक्षेत्रावर फक्त गेटपास धारकांनाच प्रवेश राहील.
- लिलाव प्रक्रियेदरम्यान कोणत्याही कारणावरून लिलाव समिती व लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तिमध्ये वाद निर्माण झाल्यास अथवा लिलाव प्रक्रियेला अंतिम मान्यता मिळल्यापासून ते लिलावाचे अंतिम कालावधी दरम्यान प्रक्षेत्रावर वादविवाद उद्भवल्यास **मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला यांचा निर्णय अंतिम राहील**.
- मत्स्यपालनाकरिता लिलाव करण्यात आलेल्या शेततळ्यातून प्रक्षेत्रावरील पिकांना व फळझाडांना आवश्यकतेप्रमाणे सिंचनाकरिता पाणी वापरण्यात येईल. व याचे संपूर्ण अधिकार हे विभागाचे प्रभारी अधिकारी यांचेकडे राहतील. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतल्या जाणार नाही.
- लिलाव करण्यात आलेले शेततळे हे फक्त मत्स्यपालनाकरिता मर्यादित राहील. शेततळ्याचे ठिकाणी अथवा विद्यापीठ प्रक्षेत्रावर मत्स्यविक्री करण्यास परवानगी मिळणार नाही. लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस मत्स्यविक्री ही विद्यापीठ परिसराच्या बाहेरच करावी लागेल.
- लिलाव समितीने सुचविल्याप्रमाणे व **मा.संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला** यांनी मान्यता दिलेल्या मत्स्यपालन कालावधीचे अंतिम तारखेनंतर लिलाव घेणाऱ्यास सुरक्षा ठेव (Security Deposit) परत मिळण्याकरिता **संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला** या नावाने अर्ज कार्वा लागेल. त्यानंतर कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण करून सुरक्षा ठेव (Security Deposit) परत करण्यात येईल.
- मत्स्य काढून नेण्याची अंतिम तारीख____________________राहील.

**संचालक,**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र**
**डॉ.पं.दे.कृ.वी.अकोला**